International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# इतिहास संशोधनातील काही कुट प्रश्न

**प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार**

भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव, जि. यवतमाळ

**प्रस्तावना :**

इतिहास हा तसा अडगळीचा विषय म्हणूनच या शैक्षणिक धोरणांत त्याची मोजणी होत आहे. प्राथमिक शिक्षणात साधारणतः तिसर्या इयत्तेपासून इतिहास विषय शिकवायला सुरुवात होते. मात्र त्यापूर्वी एक दोन थोर पुरुषांचे चरित्र/प्रसंग कथेच्या रूपांत अभ्यासक्रमांत टाकून विद्यार्थ्यांना इतिहास विषय शिकविला जातो.

आपणाकडे इतिहास जसा शास्त्रशुद्धपणे लिहिला नाही, तसा शिकविलाही नाही. जो शिकविला तो अन्य विषयांसोबत ! कधी धर्मशास्त्रासोबत ! कधी नीतीशास्त्रासोबत, अर्थशास्त्र किंवा समाजशास्त्रासोबत त्यामुळे निव्वळ इतिहास प्राचीन काळापासून लिहिला नी व शिकविलाही नाही. शास्त्रसुद्ध इतिहास लिहिण्यास सुरुवात केली ती इंग्रजांनी व त्यांनीच इतिहास शिकविलाही. इंग्रजांनी इतिहासाला जेवढे महत्व दिले त्यापेक्षा जास्त महत्व स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय इतिहास अभ्यासात व विद्यार्थ्यांसमोर आला तो केवळ राजकीय इतिहास . त्यामुळे इतिहास म्हणजे राजे, राण्या, लढाया, राजकीय नेते, पक्ष, निवडणुका, घोषणा असेच समिकरण झाले. त्याचा परिणाम असा झाला कि, इतिहास विषयाच्या चिकीत्सक, तटस्थ व विज्ञानवादी अभ्यासकांची एक मोठी फळी निर्माण न होता आपल्या पूर्वपार संस्कारात रमणारी एखादा विचार प्रवाह, संघटना /पक्ष असा हितांचा विचार करणारी चष्माधारी इतिहासकार निर्माण झालेत. (याला काही सन्माननीय अपवाद आहेत पण त्यांची संख्या फार कमी आहे).त्यांनी त्यांचाच चष्म्यातून इतिहास लिहिला. त्यामुळे इतिहासासोबत समाजाचे व शिक्षण व्यवस्थेचे फार मोठे नुकसान झाले. ही तुट भरून काढण्याची जबाबदारी भारतीय शिक्षण व्यवस्थेचा एक घटक म्हणून उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत अध्यापाकांवर मोठ्या प्रमाणात आहे. इतिहास विषयांच्या अध्यापनासंबंधी मी आपले विचार या लेखाद्वारे मांडतो.

**सामाजिक दृष्टी :**

इतिहास हा विषय केवळ विषय नसून ती सामाजिक दृष्टी आहे. हि सामाजिक दृष्टी विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हा इतिहास विषय शिकण्याचे अनेक पैकी एक उद्देश असावा. इतिहास शिकविणे म्हणजे विशीष्ट अभ्यासांतर्गत घटनांची केवळ माहिती विद्यार्थ्यांना देणे हाच हेतू बऱ्याच शिक्षकांचा असतो असा अनूभव आहे. मात्र हा दृष्टीकोण संकुचितच नाही तर इतिहास विषयांच्या उपयुक्ततेस मारक आहे. वर्तमान समाजात अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक समस्या आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्या समस्यांची पानेमुळे समजून घेणे आवश्यक ठरते. उदा. आपल्या समाजाने जातीयता, अंधश्रद्धा, स्त्री-पुरुष विषमता, आर्थिक विषमता आदी अनेक समस्या अत्यंत विघातक रूपाने उभ्या आहेत. या समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी, त्या समस्यांचा इतिहास समजून घेणे आवश्यक ठरतो. या समस्या केव्हा निर्माण झाल्यात? या समस्यामागील महत्वाचे घटक /दुवे, त्यांचे अंतर्गत संबंध या समस्यांना प्रभावित व प्रस्थापित करणारे घटक आदी बाबींचा आपण साकल्याने अभ्यास करत नाही तोपर्यंत या समस्यांचे वर्तमान स्वरूप आपणास अभ्यासता येत नाही. तसेच या समस्यांचे निराकरणाचे मार्गही ठरविता येत नाही. त्यामुळे वर्तमान समाजाच्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी या समस्यांचा इतिहास अभ्यासणे वृत्ती व नैराश्य या विकृती निर्माण होईल त्यामुळे त्यांच्यात ऐतिहासिक सामजिक दृष्टी विकसित करणे आवश्यक आहे. ही ऐतिहासिक सामाजिक दृष्टी निर्माण झाल्यास समस्यांना न घाबरता त्यांच्या प्राध्यानक्रमानुसार सोडविणे शक्य होईल. वर्तमान समाजातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी ऐतिहासिक ज्ञानासोबत सामाजिक दृष्टीही आवश्यक आहे. ती दृष्टी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे व विकसित करण्याचे म्हत्वाचे कार्य इतिहासाच्या अध्यापकांना करणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थी केवळ सामाजिक समस्यांचा इतिहास अभ्यासातील व समस्यांचा विचार करण्यापेक्षा समस्यांचे गुतांगुत व विषमता पाहून गोंधळून जातील, परिणामता त्यांच्यात पलायनवाद, नैराश्यवाद निर्माण होईल .उलट विद्यार्थी आणि संशोधक यांच्यात ऐतिहासिक सामजिक दृष्टी विकसित केली तर ते वर्तमानात्रील समस्यांचा क्रम लावून त्यांच्या निराकरणावर विचार व कृती करू शकतील आणि हेच सुजाण नागरिकाचे लक्षण आहे. हा सुजाण नागरिक इतिहासाच्या अध्यापनातून आपण घडवू शकतो .

**तटस्थता :**

भारताचा इतिहास हा जाणीवपूर्वक इतिहास म्हणून लिहिला नाही तर तो धर्म, रूढी, मनोरंजन, कला व संस्कृती आदींच्या लिखाणाबरोबर दुय्यमतेने लिहिल्या गेला. त्यामुळे भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांना तो अभ्यासतांना तारेवरची कसरत करावी लागते. अनेकदा पूर्वापार संकेत, संस्कार यामुळे अनेक ऐतिहासिक बाबींना आपण इतिहास समजतो. त्यामुळे आपली फसगत होते. भारतीय इतिहास अभ्यासतांना अभ्यासकाला मनाची तटस्थता बाळगणे आवश्यक आहे. इतिहासकाराने केव्हाही कुणाचे वकीलपत्र न घेता सतत न्यायाधीशाप्रमाणे सत्य असत्य अभ्यासून आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे व तटस्थता कायम टिकविली पाहिजे. ही बाब लिहिण्यासाठी फार सोपी आहे मात्र आचरणात आणणे अनेक इतिहासकारकानाही जमले नाही. इतिहासकारक एका बाजूस वळला कि अस्सल इतिहास बाहेर येत नाही. इतिहासकाराने जसे न्यायाधीशाप्रमाणे तटस्थ राहावे तसेच त्याने संताप्रमाणे राग, द्वेष व लोभापासून दूर रहावे. इतिहासकारक जर एका जातीचा, समूहाचा, धर्माचा राग, द्वेष करीत असेल तर तो त्या धर्माच्या, जातीच्या, समूहाच्या इतिहासास न्याय देऊ शकत नाही. तटस्थतेची बाबा जशी इतिहासकारासाठी आहे तशीच ती इतिहासाच्या अध्यापकांसाठीही आहे. शिक्षक / प्राध्यापक हा विद्यार्थ्यांसाठी इतिहासकारच असतो. तोच ऐतिहासिक घटना, चळवळ, विचारप्रवाह किंवा क्रांतीची प्रथम ओळख करून देतो. त्यामुळे इतिहास विषयाच्या अध्यापक / शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी आहे. त्याने शिवाजी महाराजांचा इतिहास शिकवितांना शिवाजी म्हणजे हिंदू व औरंगजेब म्हणजे मुस्लिम असे धार्मिक समिकरण विद्यार्थ्यांच्या डोक्यात निर्माण केले तर हे विद्यार्थी जीवनभर हिंदू विरुद्ध मुस्लिम हा द्वेष आपल्या मेंदूत जोपासतील.त्यामुळे धर्म द्वेश मुलक पिढी निर्माण होईल.हे कोणत्याही सुसंस्कृत देशाला परवडणारे नाही. मध्ययुगीन इतिहास अशाच समीकरणाने अनेक इतिहासकाराने लिहिला व स्वार्थी राजकीय नेत्यांनी त्याचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात केला. त्यामुळे भारतात हिंदू – मुस्लिम दंगली झाल्यात व होत आहेत. या दंगलींची विदारकता व दाहकता आपण अध्यापक / शिक्षक म्हणून जाणता.

**चिकीत्सक दृष्टी :**

वरील मुद्यांच्या स्पष्टीकरणात आपण पहिलेच आहे की, इतिहासकाराला सत्य असत्याची पारख करता आली पाहिजे, ही पारख करणे म्हणजेच चिकीत्सक दृष्टी होय. भारतीय समाजावर अनेक कथा, दंतकथांचा मोठा प्रभाव आहे. त्या दंतकथांना सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात फार महत्वाचे स्थान असते मात्र तो त्यांचा इतिहास नसतो. अशावेळी इतिहासकाराने आपल्या अभ्यासाच्या/अनुभवाच्या बळावर समाजातील दंतकथांना दूर सारत अस्सल इतिहास लिहावा. अनेकदा समाज दंतकथांना आपला इतिहास समजत असल्यामुळे दंतकथा ह्या दंतकथाच आहेत हे सत्य स्विकारण्याच्या मानसिकतेत नसतो. तेव्हा समाजाच्या टिकेचा विचार न करता निव्वळ व निखळ सत्य मांडण्याचा प्रयत्न इतिहासकार करतो. ही मोठी समस्या इतिहासकारांसमोर असते असतो. भारतीय समाज हा प्रामुख्याने शहर , गाव, खेडे, वस्त्या,तांडे,पाल,डोंगर दर्या खोर्यात वसलेला आहे . समाजात जशी मोठी आर्थिक दरी आहे व ती दिवसेंदिवस वाढत आहे .तसेच ज्ञानाच्याही क्षेत्रात विषमता वाढत आहे. तंत्रज्ञान सर्वत्र पोहचत आहे याचा अर्थ समाज विज्ञानवादी होत आहे असा त्याचा अर्थ नाही.उलट तंत्रज्ञानाचे सर्व फायदे घेऊन अवैज्ञानिक संकल्पना , प्रतिक ,साहित्य ,परंपरा यांना अधिक कवटाळनारा समाजात एक मोठा वर्ग निर्माण झाला आहे. हे वर्तमानाचे आकलन करून ऐतिहासिक संशोधन करने हे मोठे संशोधकांसमोर आहे

**साराशं** : भारतीय इतिहासचे अध्ययन व अध्यापन किंवा संशोधन करतांना सामाजिक दृष्टी , तटस्थता, चिकीत्सक दृष्टी या मुद्द्यांचा विचार केला पाहिजे अन्यथा समाजात व देशात अत्यंत गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात .

**संदर्भ ग्रंथ** :

1. मराठी विश्वकोश ,खंड २ ,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ , मुंबई
2. प्रति इतिहास ,ले. चंद्रशेखर शिखरे ,जिजाई प्रकाशन, पुणे
3. निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड १ इतिहास लेखन मीमांसा ,लोकवाङ्मय गृह ,मुंबई